# जाहिरात.

पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद शहर अंतर्गत पोलीस स्टेशन/शाखा-कार्यालय यांचे शासकीय कामकाजाच्या तसेच तपासीक अंमलदार यांचे गुन्हयाचे तपासाचे कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती काढणेसाठी दिनांक.३१/०३/२०२२ पावेतो करार (AMC) करणेसाठी सिलबंद दरपत्रके (निविदा) मागविण्यात येत आहेत.

**नियम व अटी :-**

१. सदरचे दरपत्रकामध्ये एक झेरॉक्स कॉपी/प्रत काढणेसाठी सर्व करासहीत/GSTसह दर भरुन सिलबंद दरपत्रक दि.१८/६/२०२१ ते दि.२७/०६/२०२१ रोजी पावेतो सकाळी ०९.४५ ते १८.१५ या कार्यालयीन कामाचे वेळेमध्ये कक्ष-९, प्रबंधक,पत्रव्यवहार शाखा,पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद शहर येथील बंद पेटीमध्ये टाकावीत.

२. पुरवठादार यांनी दरपत्रकासोबत GST No., Pan Card छायांकीत प्रत सादर करावी. तसेच दरपत्रक/कोटेशनमध्ये GST No. नमुद करणे आवश्यक आहे.

३. कामाची दरपत्रक मंजुर करणेचे अथवा रद्द करणेचे सर्व अधिकार मा.पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर यांना राहतील. त्याबाबतची कारणे सर्व संबंधितास कळविणे हे या कार्यालयास बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी.

४. संस्था/पुरवठाधार यांचे दुकान नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत सादर करावी.

५. न्युनतम दराचे दरपत्रक मंजुर झाल्यानंतर यशस्वी निविदाधारकास कार्यादेश देण्यात येतील. व कार्यादेशाप्रमाणे अटी व शर्तीनुसार व मान्य केलेले दरानुसारच शासकीय कागदपत्रांच्या छायांकीत प्रती काढुन देणे बंधनकारक राहतील.

६. सर्व पोलीस स्टेशन व शाखा/कार्यालय यांचे झेरॉक्स प्रती काढणेसाठी शासन सोयईचे दृष्टीकोणातुन पुरवठा धारक यांना दोन झेरॉक्स मशीन एक पोलीस स्टेशन छावणी, व एक पोलीस स्टेशन क्रांती चौक येथे कार्यरत ठेवाव्या लागतील. व सदर दोन्ही ठिकाणी झेरॉक्स प्रती काढणेसाठी लागणारा सर्व खर्च जसे झेरॉक्स पेपर, इंक, ऑपरेटर, असा पुरवठाधारकासच करावा लागेल. तसेच झेरॉक्स मशीनसाठी लागणारा विद्युत प्रवाहासाठी(विज कनेक्शन) पुरवठाधारकास स्वतंत्र मिटर/सबमिटर घ्यावे लागेल.

७. झेरॉक्स प्रती काढण्यासाठी झेरॉकस मशीनला उच्चप्रतीचा टोनर व इंक आणि पेपर वापरणे बंधनकारक असले. छायांकीत प्रतीची स्पष्टता ही अतिशय उच्च प्रतीची असायला हवी. स्पष्टता उच्चप्रतीची नसल्यास प्रती पेज रु.२/- इतका दंड आकारण्यांत येईल.

८. तसेच पुरवठाधारक यांनी प्रत्येक पोलीस स्टेशन, शाखा/कार्यालय यांचेसाठी विहित नमुन्यात स्वतंत्र रजिस्टर ठेवुन सदर रजिस्टरवर काढलेल्या छायांकीत प्रतीची कॉलमवाईज नोंदी घ्याव्यात. व महिण्याचे शेवटी देयकासोबत सदरचे रजिस्टरवरील नोंदीची छायांकीत प्रत सादर करावी.

९. झेरॉक्स प्रती काढणेचे देयकातुन प्रचलीत शासन नियमानुसार २% आयकर व २% GST कपात करुन उर्वरित रक्कम देय राहील.तसेच मान्य केलेले दर सर्व करासहीत असलेने झेरॉक्स वरील कोणत्याही प्रकारचा दुरुस्तीचा वा ईतर खर्च अनुज्ञेय राहणार नाही.

१०. दरपत्रक मंजुर झाल्यानंतर व कार्यादेश दिलेनंतर पुढे पुरवठादार यांची कामे समाधानकारक नसल्यास किंवा कर्यादेशातील अटी व शर्तीचा भंग झाल्यास किंवा झेरॉक्स प्रती काढणेबाबत वारंवार तक्रारी आल्यास मा.पोलीस आयुक्त,औरंगाबाद शहर हे कोणत्याही टप्प्यात सदरचा करार रद्द करु शकतील.

(पान नंबर २)

११. अन्य पुरवठाधारकाशी उपकरार करणे हे अटीचे उल्लंघनकरणारे असेल, तशी आवश्यकता भासल्यास मा.पोलीस आयुक्त,औरंगाबाद शहर यांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

१२. यशस्वी दरपत्रक धारकाने प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत छयांकीत प्रती काढलेचे देयक विहित नमुना रजिस्टरचे नोंदीसह संबंधीत प्रभारी अधिकारी यांचे मार्फतीने या कार्यालयास सादर करणे आवश्यक राहिल.

१३. अनुदानाअभावी देयकाचे प्रदान करण्यास विलबं झाल्यास पुरवठाधारकास विलंब शुल्काची मागणी करता येणार नाही.

<u>(मा.पोलीस आयुक्त यांचे मान्यतेने).</u>

( मिना मकवाना )
पोलीस उपआयुक्त(मुख्यालय)
पोलीस आयुक्त औरंगाबाद शहर.करिता.